**विषय :- शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागावर लावण्याबाबत.....**

**जिल्हा परिषद, सोलापूर**
**सामान्य प्रशासन विभाग**
**जा.क्र. जिपसो/साप्रवि-१/कार्या-१/प्र.क्र.०९-२०१७/1658/२०२५**
**दिनांक - /१२/२०२५**
01/01/2026

## परिपत्रक

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र.जीएडी-३२०३६/३१/२०२५-जीएडी(रवका-१), दिनांक १० सप्टेंबर २०२५ अन्वये काही शासकीय अधिकारी/ कर्मचारी हे कार्यालयात असताना आपले कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागात लावत नसल्याने याबाबतची अंमलबजावणी प्रभावीपणे होणेकामी शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात असताना आपले कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागात लावावे व न लावणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करणेबाबत संबंधित विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख यांना सक्त सूचित करणेबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने सर्व अधिकारी व कर्मचारी यांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. जिल्हा परिषद कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात प्रवेश करताना आणि कार्यालयात असताना आपले कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागावर लावावे.
२. कार्यालयात प्रवेश करताना आणि कार्यालयात असताना आपले कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागावर न लावणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्यपूर्वक नोंद घेण्यात यावी.

कुलदीप जंगम (भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सोलापूर**

**प्रति,**

१) **खातेप्रमुख, ---------------- (सर्व)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

२) **गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती, --------------- (सर्व)**

२/- सदर परित्रकाची प्रत आपल्या अधिनस्त सर्व कार्यालय प्रमुखांना पाठवून सदर परिपत्रकातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करणेबाबत सुचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

प्रत : अपर आयुक्त (आस्थापना), पुणे विभाग, पुणे यांना माहितीस्तव अग्रेषित.
प्रतः अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर.
प्रतः प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर.